**पाणी पुरवठा व स्वच्छता विभागा अंतर्गत किमान गरजा कार्यक्रमाच्या निधीतून प्रचार, प्रसिध्दी व मनुष्यबळ विकासासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय, क्रमांक ग्रापापु-१००३/प्र.क्र. २५६/पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक- १० जुलै, २००६**

**वाचा :-** (१) शासन निर्णय, ग्रा.वि.वि. क्रमांक व्हीपीएम-२०८५/सी.आर. १९४०/२२, दिनांक ९/८/१९८५

(२) शासन निर्णय, पा.पु. व स्व.वि. क्रमांक ग्रापापु-१००५/सी.आर. १९८०/पापु-०७, दिनांक- ४/९/१९९६

(३) शासन निर्णय, पा.पु. व स्व.वि. क्रमांक ग्रापापु-१०९६/प्र.क्र. ११५७/पापु-०७, दिनांक ५/९/१९९६

(४) शासन निर्णय, पा.पु. व स्व.वि. क्रमांक ग्रापापु-१०९९/प्र.क्र. ३२८/पापु-०७, दिनांक २७/७/२०००

(५) शासन निर्णय, पा.पु. व स्व.वि. क्रमांक ग्रापापु-१००३/प्र.क्र. ४/पापु-०७, दिनांक ७/२/२००३

**प्रस्तावना :**

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम राबविण्यासाठी केंद्र शासनाच्या सुधारित मार्गदर्शक सुचना, केंद्र शासनाच्या **वर्धित वेग ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमासाठी** व **राज्याच्या किमान गरजा कार्यक्रमांतर्गत** लागू करण्याचा धोरणात्मक निर्णय संदर्भिय क्रमांक ४ येथील दिनांक २७ जुलै, २००० च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आला आहे. या शासन निर्णयानुसार ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम, मागणी आधारित पुरवठा आणि लोकसहभागच्या तत्वावर राबविण्यात येत आहे. यानुसार, योजनेची **निवड, आखणी व अंमलबजावणी** ही संबंधित लाभार्थ्यांनी करावयाची आहे. तर, योजनेच्या देखभाल व दुरुस्तीवरील १०० % खर्च संबंधित लाभार्थ्यांनी करावयाचा आहे. शासन यंत्रणेचा यामधील सहभाग हा **सहाय्यकर्त्याचा** राहणार आहे. ही सहाय्यकर्त्याची भूमिका शासनाव्दारे, जिल्हा परिषदेमार्फत राबवावी असे धोरण ठरविण्यात आले आहे. त्यानुसार जिल्हा परिषदेत आवश्यक तांत्रिक / अतांत्रिक कर्मचारी वर्ग ग्रामीण पाणी पुरवठा विभागात / उप विभागात उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

२. भारतीय राज्य घटनेच्या ७३ व्या घटना दुरुस्तीनंतर राज्यघटनेच्या ११ व्या अनुसूचीनुसार पिण्याच्या पाण्याचा विषय हा संपूर्णपणे पंचायत राज संस्थांच्या अधिकार क्षेत्रात आल्यानंतर राज्य शासनाने अधिकाधिक



८७७८

अधिकार व जबाबदारी पंचायत राज संस्थांकडे देण्याच्या ज्या पुरोगामी धोरणाचा अवलंब केला आहे, त्या धोरणाचा एक महत्वाचा भाग म्हणून पिण्याच्या पाण्याचे सुधारित धोरण जाहीर केले आहे. एवढेच नव्हे तर, त्रिस्तरीय पंचायत राज व्यवस्थेअंतर्गत जेथे जेथे शक्य होईल तेथे तेथे हे अधिकार जास्तीत जास्त प्रमाणात पंचायत राज संस्थांपैकी ग्रामस्तरावरील ग्रामीण जनतेचा सगळयात जवळचा स्तर असणा-या ग्रामपंचायतीस किंवा ग्रामस्तरावरील ग्रामपंचायती अंतर्गत इतर संस्थात्मक घटकांना देण्याचे आणि अशाप्रकारे लोकाधिकार आणि लोकनिर्णय याचे लोकशाही स्वरुप आणखी प्रगल्भ करण्याचे जे धोरण शासनाने अवलंबिले आहे त्या अनुषंगाने ग्रामस्तरावर पिण्याचे पाणी पुरवठयाचे जास्तीत जास्त अधिकार देण्याचा उद्देश या सुधारित धोरणामागे आहे. ग्रामस्तरावरसुध्दा निर्णय घेताना ते प्रातिनिधीक स्वरुपाचे न राहता त्याला आणखी व्यापक सार्वजनिक स्वरुप यावे म्हणून व्यावहारिकदृष्टया शक्य असेल तेथे निर्णयाधिकार ग्रामसभेला देऊन लोकाभिमुख लोकशाही (Direct Democracy) हे धोरण पाणी पुरवठयाच्या सुधारित धोरणात प्रतिबिंबित करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

३. जी जबाबदारी शासन यंत्रणा, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व जिल्हा परिषदेव्दारे एकेकाळी उचलली जात होती ती सर्व कामे व त्यासाठीचे अधिकार व जबाबदारी आता ग्रामस्थांवर सोपविण्यात आलेली आहेत. योजना पूर्ण करुन घेणे, तसेच देखभाल व दुरुस्ती करणे, खर्चाचे हिशोब ठेवणे, माल खरेदी करणे ही सर्व कामे ग्रामस्तरावर करण्यात येत आहेत. यासाठी पगारी नोकर ठेवून काम करण्यापेक्षा ग्रामस्थांच्या विविध समित्यांकडून सेवाभावी पध्दतीने अथवा कंत्राटी पध्दतीने अथवा गावातच पॅराप्रोफेशनल प्रशिक्षित करुन ही कामे ग्रामस्तरावर करुन घेण्यात येत आहेत. कोणताही अतिरिक्त कर्मचारी वर्ग ग्रामस्तरावर नेमण्यासाठी शासन निधी उपलब्ध करुन देणार नाही. फक्त भांडवली खर्चाच्या ९० % रक्कम दिली जात आहे / जाणार आहे. देखभाल दुरुस्तीसाठी गावाने स्व:निधीतून (योग्य प्रमाणात पाणी पट्टी बसवून व तीची वसूली करुन) १०० % खर्च करावयाचा आहे.

४. उक्त परिस्थितीत ग्रामस्थांनी ही योजना स्वतःची समजून राबवावी व त्यातून स्वतःच्या गरजा भागवून घ्यावयाच्या दृष्टीने त्यांचे मत परिवर्तन व सक्षमीकरण करावे लागणार आहे. तसेच, ही विविध तांत्रिक / आर्थिक व प्रशासकीय जबाबदारी पगारी कर्मचारी न नेमता ग्रामस्थांनी, ग्रामपंचायतीने व गावांतील महिला मंडळ, बचत गट, युवक मंडळ व नागरिक संस्थांकडून (Civil Society Group) करुन घेण्यासाठी त्यांचे मोठया प्रमाणावर प्रशिक्षण करावे लागणार आहे. हे प्रशिक्षण सेवाभावी संस्था अथवा स्थानिक तंत्र निकेतन, औद्योगिक प्रशिक्षण संस्था इ. मार्फत करुन घ्यावे लागणार आहे.

५. त्याचप्रमाणे, शासन यंत्रणा व जिल्हा परिषदेतील यंत्रणेला आतापर्यंत त्यांची पुरवठादार / अंमलबजावणीकर्त्याची भूमिका बदलून ग्रामस्थांना सहकार्य करणारा घटक म्हणून काम करावे लागणार आहे. यासाठी त्यांची काम करण्याची पध्दत बदलावी यासाठी बरेचसे प्रशिक्षण त्यांना द्यावे लागणार आहे.



७७८

६.	जागतिक बँकेने व केंद्र शासनानेही त्यांच्या पाणी पुरवठा व स्वच्छतेच्या विषयक ज्या विविध योजना जाहिर केल्या आहेत त्या सर्व योजना आता या नवीन धोरणानुसारच अंमलात आणल्या जात आहेत. त्यामुळे केवळ भौतिक साधनसामुग्री निर्माण करण्यासाठीच निधी उपलब्ध करुन न देता मोठया प्रमाणावर लोकप्रशिक्षण, क्षमता बांधणी यासाठी त्यांच्या योजनांमध्ये निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

७.	केंद्र शासनाने नुकत्याच जाहिर केलेल्या स्वजलधारा योजनेतही उपलब्ध करुन देण्यात येणा-या एकूण भौतिक साधनसामुग्रीसाठीच्या निधीच्या १० % पर्यंत रक्कम लोकप्रशिक्षण व क्षमता बांधणीसाठी खर्च करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे.

८.	या योजनांमध्ये जरी मागणी आधारित लोकसहभागाचे तत्व अंगीकारण्यात आले असले तरी, लोकशिक्षण, प्रशिक्षण, क्षमता बांधणी आणि सेवाभावी संस्थांच्या नियुक्त्यांसाठी कोणताही निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही. त्यामुळे, लोकशिक्षण, प्रशिक्षण, क्षमता बांधणी आणि सेवाभावी संस्थांच्या परंतु, राज्य शासनाच्या निधीतून (किमान गरजा कार्यक्रमातून) महाजल कार्यक्रम राज्यात राबविण्यात येतो, तसेच जलस्त्रोताच्या संवर्धनासाठी शिवकालीन पाणी साठवण योजना राबविण्यात येते. नियुक्त्यांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय :**

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करुन, ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या वीज देयकांच्या प्रतिपूर्तीसाठी व पाणी शुध्दीकरणासाठी वापरण्यात येणा-या टी.सी.एल. पावडरच्या खरेदीसाठी संदर्भिय क्रमांक १ ते ३ येथील शासन निर्णयान्वये जिल्हा परिषदांना व ग्राम पंचायतींना देण्यात येणा-या अनुदानात, संदर्भिय क्रमांक ५ येथील शासन निर्णय, दिनांक ७.२.२००३ अन्वये सन २००३-२००४ या आर्थिक वर्षापासून दरवर्षी टप्प्याटप्प्याने कपात करण्यात आल्याने शिल्लक राहीलेला त्या प्रमाणापर्यंतचा निधी व मार्च २००७ नंतर पूर्णतः उपलब्ध होणारा निधी राज्याच्या किमान गरजा कार्यक्रमांमधून मागणी आधारित लोकसहभागाच्या धोरणानुसार राबाविण्यात येणा-या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी **लोक प्रशिक्षण, क्षमता बांधणी, तज्ञ सल्लागार नियुक्त्या, सेवाभावी संस्थेच्या नियुक्त्या** यासाठी संबंधित ग्राम पंचायतींना व जिल्हा परिषदांना उपलब्ध करुन देण्यासाठी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागात नवीन धोरणांची अंमलबजावणी करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या **सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्षाला** उपलब्ध करुन देण्यास शासन मान्यता देत आहे. सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्षाने या निधीमधून करावयाच्या खर्चाबाबतच्या सूचना वेळोवेळी या विभागाकडून देण्यात येतील. त्यांनी सदर निधीचे स्वतंत्र लेखे ठेवून खर्चाचा हिशोब या विभागास दरमहा पाठवावा.



८८२

२. वरील प्रमाणे उपलब्ध करुन दिलेल्या निधीसाठी स्वतंत्र लेखाशिर्ष उघडून त्यामध्ये ठेवण्यात यावा व यामधून उक्त प्रयोजनांसाठी हा निधी उपलब्ध करुन देण्यात यावा.

३. हा शासन निर्णय नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीने वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र. ३२७/०६/व्यय-३, दिनांक १३ जून, २००६ अनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००६०७१०११५९५८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**(संजीव कुमार)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव
मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद, (सर्व)
मा. मुख्य सचिव
विभागीय आयुक्त (सर्व)
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
जिल्हाधिकारी (सर्व)
प्रकल्प व्यवस्थापक, जलस्वराज्य प्रकल्प, सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, बेलापूर
प्रकल्प अधिकारी, आपलं पाणी प्रकल्प, सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, बेलापूर
मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
तहसीलदार (सर्व)
जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
जिल्हा माहिती अधिकारी (सर्व)
कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, (सर्व)
उप अभियंता , ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखा परीक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखा परीक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), नागपूर
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व)
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
मंत्रालयातील इतर सर्व विभाग
संगणक कक्ष, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षकीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती (पापु-०७), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग



८८०